# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : rdtenagpur.org.in

अतितात्काळ

इमेलव्दारे

क्रमांक : तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१२/ 3153

दिनांक : 31 OCT 2012.

प्रति,

____________________

____________________

____________________

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:– **खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीचे प्रस्ताव सादर करण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०१२–१३**

संदर्भ:– उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्रमांक टीईएम – २०१२/प्र.क्र. ५३ (२)/तांशि–४, दि. ११ ऑक्टोबर, २०१२

शैक्षणिक वर्ष २०१२–१३ मध्ये आपल्या संस्थेतील प्रवेशित व पात्र विद्यार्थ्यांना ई.बी.सी. मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक १७/११/२०१२ पर्यंत खास प्रतिनिधीमार्फत खालील मुददयांप्रमाणे तपासणी करुन या कार्यालयास सादर करावे.

१. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी हा CAP व्दारे प्रवेशित असून खुल्या प्रवर्गातील असणे आवश्यक आहे **(ACAP व Institute Level व्दारे प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करु नये)**.

२. आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न रु. १ लक्ष रकमेच्या आत असणे आवश्यक आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांकडून आर्थिक **वर्ष २०११–१२ चे उत्पन्न प्रमाणपत्र** संबंधीत तहसिलदार, नायब तहसिलदार यांचेव्दारे निर्गमित केलेले असावे इतर कुठलेली उत्पन्नाचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

३. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करतांना विहित नमुन्यात **प्रवेशाचे वर्षनिहाय, अभ्यासक्रम निहाय** विद्यार्थ्यांची यादी **हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉफी (पेन ड्राईव्ह / सीडी मध्ये)** सादर करावी, त्याशिवाय आपल्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सदर यादी ही इंग्रजीमध्ये **Microsoft Excel Format (Excel) मध्ये Times New Roman** या फॉन्टमध्येच सादर करावी.

४. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जासोबत **अधिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे आवश्यक आहे अन्यथा त्यांचे अर्ज रद्द करण्यात येईल**.

५. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जासोबत **अपत्य प्रमाणपत्र (तीन पेक्षा अधिक नाही) असणे आवश्यक आहे अन्यथा त्यांचे अर्ज रद्द करण्यात येईल**.

६. पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज सादर करतांना प्रत्येक विद्यार्थ्यांनी कॅप व्दारे प्रवेशाचे **Admission Confirm Letter** जोडले आवश्यक आहे किंवा या कार्यालयाव्दारे तसेच DTE व्दारे प्रमाणित केलेली गुणवत्ता यादीची सांक्षाकित प्रत पात्र विद्यार्थ्यांचे नांव **Highlighted** करुन सदर पानाची प्रत प्रत्यक अर्जासोबत लावणे आवश्यक आहे.

७. प्रस्तावासोबत आपल्या संस्थेच्या बॅंक खात्याची बिनचुक माहिती विहित नमुन्यात स्वाक्षरी करुन व बॅंकेव्दारे प्रमाणित करुन सोबत जोडावी.

८. पात्र विद्यार्थी हा मागिल परीक्षा उत्तीर्ण/एटीकेटी असणे आवश्यक आहे त्यासाठी अर्जासोबत गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड असल्यास खंड प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जासोबतची सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे आवश्यक आहे. नसल्यास सदर अर्ज रद्द करण्यात येईल.

**वरील बाबींची पुर्तता सर्व विद्यार्थ्यांनी केली असल्याबाबतची खात्री करुन व संस्थास्तरावरच अर्जाची छाननी करुन फक्त पात्र विद्यार्थ्यांचे अर्जच या कार्यालयास सादर करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास सादर करु नये. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा आपले संस्थेचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता